**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- १८.**

**मा.ह प्रभाग समिती सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक – ०७**

**सभावृत्तांत**

दिनांक – ०५/१२/२०१९ वेळ – दुपारी – २.३० वा.

---

पिंपरी चिचवड महानगरपालिकेच्या मा. ह प्रभाग समितीची मासिक सभा दिनांक ०५/१२/२०१९ रोजी दुपारी २.३० वा. ह क्षेत्रीय कार्यालयातील **पं.दीनदयाळ उपाध्याय** सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य/नगरसदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत | - | सभापती |
| २) मा.शाम गणपतराव लांडगे | - | सदस्य |
| ३) मा.सुजाता सुनिल पालांडे | - | सदस्या |
| ४) मा. बनसोडे राजू विश्वनाथ | - | सदस्य |
| ५) मा.आशा धायगुडे – शेंडगे | - | सदस्या |
| ६) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत | - | सदस्या |
| ७) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे | - | सदस्य |
| ८) मा.राजापुरे माधवी राजेंद्र | - | सदस्या |
| ९) मा.चौगुले सीमा दत्तात्रय | - | सदस्या |
| १०) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे | - | सदस्या |
| ११) मा.थोरात ज्ञानेश्वर मुरलीधर | - | स्विकृत सदस्य |
| १२) मा.संजय गुलाब कणसे | - | नामनिर्देशीत सदस्य |

याशिवाय मा.संदीप खोत - क्षेत्रीय अधिकारी (ह क्षेत्रीय कार्यालय), श्री.कोळप एस.डी. प्रशासन अधिकारी, श्री.सुपे ए.के. लेखाधिकारी, श्री.संजय खाबडे – कार्यकारी अभियंता विद्युत, श्री.रामेश्वर मोहाडीकर - उपअभियंता जलनि:सारण विभाग, श्री.विजय काळे उपअभियंता जलनि:सारण विभाग , श्री.धनंजय गवळी – उपअभियंता स्थापत्य, श्री.विजयसिंह भोसले – उपअभियंता स्थापत्य, श्री.संजय काशिद – उपअभियंता बीआरटीएस, मा.श्री.शशिकांत दवंडे – उप अभियंता – पाणीपुरवठा, म.मोमीन झेड.आय.- उपअभियंता, श्री.मोहन खोंद्रे – उपअभियंता-झो.नि.पू., श्री.पवार एस.आर.- प्र.उपअभियंता पाणीपुरवठा, श्री.मोरे चंद्रकांत – प्र.उपअभियंता (उद्यान स्था, श्री.दिलीप धुमाळ – उपअभियंता विद्युत, डॉ.यशवंत इंगळे – वाय.सी.एम.रुग्णालय, डॉ.आनंद करणे - वाय.सी.एम.रुग्णालय , श्री.दांगडे सुनिल ज्ञानदेव – क.अ.स्थापत्य, श्री.संदीप जीवन लोहकरे – क.अ.जलनि:सारण, श्री.समीर दळवी – क.अभियंता-विद्युत, श्री.के.एस.अंदुरे – क.अभियंता, श्रीम.प्रीती यादव – क.अभियंता-जलनि:सारण, श्री.कोतकर पी.बी. क.अ.झोनिपू स्थापत्य, , श्री.एस.एन.गर्जे – क.अभियंता, श्री.महेंद्र के.देवरे – क.अभियंता (स्था), श्री.सानप एस.एस.-क.अभियंता, श्री.कांबळे व्ही.सी.-क.अभियंता, श्री.एस.ए.बगली- क.अभियंता झोनिपू, , श्री. एस.बी.लांडगे – उद्यान सहाय्यक, श्री.जे.व्ही.पटेल-सहा.उद्यान अधिक्षक, श्री.अजय जाधव – मुख्य आरोग्य निरीक्षक, श्री.चौहान एस.एच. – आरोग्य निरीक्षक, , श्रीम.रश्मी तुंडलवार – आ.नि., श्री. उध्दव डवरी – आ.नि. कचरावाहतुक, श्री.कोटीयाना डी.एम. – आ.नि. पशुवैद्यकिय, श्री.प्रमोद बांदल, श्री.वाघमारे आर.एम., श्री.विलास वाबळे- सहा.सुरक्षा अधिकारी, श्रीमती जयश्री साळवे – क्रीडा पर्यवेक्षक

----------

मा. सभापती – सर्व सन्मा सदस्य व अधिकारी/कर्मचारी यांचे स्वागत सभेस सुरुवात करणेत येत आहे.

प्रशासन अधिकारी तथा सचिव : माहे डिसेंबर २०१९ च्या दिनांक ०५/१२/२०१९ रोजीचे मासिक सभेचे कामकाज सुरु करण्यास मान्यता मिळावी.

मा. सभापती : आजच्या सभेचे कामकाज सुरु करण्यात मान्यता देणेत येत आहे.

**प्रशासन अधिकारी तथा सचिव**, सभाशाखा : मागील सभा कार्यपत्रिका क्र.०६ माहे नोव्हेंबर २०१९ चा सभावृत्तांत कायम करण्यास मान्यता मिळावी.

**मा. सभापती** : माहे नोव्हेंबर २०१९ कार्यपत्रिका क्र. ०६ चा सभावृत्तांत कायम करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**प्रशासन अधिकारी तथा सचिव** - सभाशाखा :सन्मा. सदस्य यांनी सादर केलेले ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेत आले.

**विषय क्र. १-** अंदाजपत्रकामध्ये नवीन कामांचा समावेश करणेबाबत. मा.माधवी राजेंद्र राजापुरे यांचे दिनांक ५/१२/२०१९ चे पत्र.

---------

**प्रशासन अधिकारी तथा सचिव - सभाशाखा** : सन्मा. सदस्य यांनी सुचविलेल्या प्रभाग कामकाजाबाबत चर्चा करणेस मान्यता मिळावी.

**मा.ज्ञानेश्वर थोरात –स्विकृत सदस्य-** प्रभाग क्र. ३० मध्ये मापालिकेचे कर्मचारी विशाल जाधव व ठेकेदारकाडे काम करीत असलेले कर्मचारी नागेश जमादार यांचे दुख:द निधन झालेले आहे. त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

**मा.राजू बनसोडे** – अनुमोदन देण्यात आले.

**(सर्वांनी दोन मिनिटे उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली. )**

**मा.आशा शेंडगे-** दिनांक १ डिसेंबर रोजी ड्रेनेजचे काम सुरु असताना महापालिकेचा कर्मचारी वाचविणेसाठी गेल्याने विशाल जाधव यांना वीर मरण आले. तसेच माजी नगरसेवक कै.सुरुदास गायकवाड यांना श्रध्दांजली वाहण्यात आली. यानंतर यांना उदरनिर्वाह करण्यासाठी महापालिकेकडून मदत मिळावी. तसेच कॉन्ट्रॅक्टरकडून सुध्दा मदत मिळण्यासाठी त्याबाबत प्रोव्हीजन आहे का नाही याबाबत आम्हाला माहित नाही परंतू त्यांना मदत मिळाली पाहिजे.

**(महापालिकेचे महापौरपदी मा.माई ढोरे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.)**

**मा.संजय गुलाब कणसे-नामनिर्देशीत सदस्य** - आपले ह प्रभागात जी घटना झाली ती लज्जास्पद आहे. यापुर्वी कासारवाडीमध्ये लहान मुलाचा प्राण गेला. याबाबत अधिकारी व कॉन्ट्रॅक्टर जबाबदार आहे. रविवार असून काम का केले? याबाबत तेथील नगरसेवकांना माहिती दिली पाहिजे. एखादया जीवाशी खेळण्याचा काहीही अधिकार नाही. यामध्ये जो जवान गेला त्याचे पत्नीने कोणाकडे पाहायचे. यापुर्वी लहान मुलाचा जीव गेला. मिटींगमध्ये पुढचे विषय घेऊ नका. या विषयावर काही तर तोडगा काढला पाहिजे.

**मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत** – ड्रेनेजचे काम करणार याबाबत कल्पना नव्हती. रविवारी काम का केले? मजूर कर्मचा-यांला जास्त पैसे देतो असे सांगितले. त्याठिकाणी वॉचमन नाही, सेफ्टी नाही तरी त्यांनी काम का केले? कॉन्ट्रॅक्टरची जबाबदारी आहे. बेकार परिस्थिती निर्माण झाली आहे. खूपच टेन्शन आले होते. बेजबाबदारपणाचे काम करणे हे पटते का? मजूराची परिस्थिती बिकट आहे. ठेकेदाराला काळया यादीत टाका. खड्डे खणतात आणि निघून जातात. ते खड्डे बुजवायला नको? का? पाणी नसते, लाईट नसते प्रत्येक वेळी काहीना काही प्रॉब्लेम आहे. याबाबत खुलासा करण्यात यावा.

**मा.संजय गुलाब कणसे-नामनिर्देशीत सदस्य** – आम्ही नगरसेवक त्या ठिकाणी थांबलो म्हणून बरे झाले नाहीतर पब्लिकने अधिका-यांना काय केले असते हे सांगता येत नाही.

**मा.आशा शेंडगे** – प्रभाग क्र. ३० अमृत योजनेमध्ये विशाल जाधव तसेच नागेश जमादार यांचे निधन झाले. हे सगळे घडत असताना १२.४३ वा.काळेसाहेबांनी साईटला व्हीजीट केली. मधल्या भागात पाईप लाईन टाकली आहे. डांबरीकरणासाठी रस्ता झाडला होता. ठेकेदार यांनी अचानक तो का शिफ्ट का झाला? दुर्दैवाने तीन मृत्यू झाले. यापुर्वी पाच वर्षावा मुलगा केला. पहाटे पावणेपाच वा.तेथून निघाले. मृत्युची अवस्था भयानक होती. अनेक ठिकाणी खड्डे उघडे अवस्थेत पडलेले आहेत. पाटील मुख्य कॉन्ट्रॅक्टर आहे. ज्युनिअर सब कॉन्ट्रॅक्टर यांचा कधी छडा लागायचा. दुस-या कोणाला तरी ते काम हॅण्डओव्हर करतात. दहा ठेकेदार तेथे जातात. अधिका-यांना याचा सुगावा लागतो. या सगळयांनी का म्हणून आपले शहरात काम करायचे. आपले शहरात काम करायला तो काय आपला बाप लागतो. २५,३० फूट खोदकाम करायचे व पाईप अगदी छोटा असतो. आज त्याठिकाणी कोण काम करतो त्यांनी पाहिले नाही म्हणून ही दुर्घटना घडली. अधिका-यांची लेखी परवानगी असल्याशिवाय काम केले नाही. आमच्या शहरात कुणीच काम करु नको. नऊ तासामध्ये आम्ही नगरसेवक एक मिनीटसुध्दा बसलो नाही. बसणे सुध्दा शक्य नव्हते. जीव त्या ठिकाणी गेलेले आहे. चोख काम

करणार नसाल तर एकही काम करु नका. अधिका-यांना विनंती करायची आहे की, आमच्या प्रभागातील स्वच्छता केली तरी चालेल. पंपासमोर खड्डे खोदले तर ते अजुन बुजवि ले नाही. कुठल्याही विभागाची कामे असेल तरी अधिका-यांची जबाबदारी आहे. त्या ठेकेदारांची शहनिशा करावी. आमचे वॉर्डात एकाही अधिका-यांने काम करायचे नाही. प्रचंड त्रास व वेदना होतात.

**मा.सुजाता पालांडे** – मृत झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना मदत करणे. त्यांना लहान मुलगी आहे. त्यांचे मिसेसला कामाला घेऊ शकतो. परंतू आपण आपल्याला माफ करु शकणार नाही. प्रत्येक वॉर्डची ही अवस्था आहे. स्मार्ट सिटीचे परमिशन आहे का? प्रभाग क्र. २० स्मार्ट सिटीच्या नावाखाली का खोदले जाते. परमिशन दिले आहे का? एमआयडीसीमध्ये खोदकाम झालेले आहे. राडारोडा पडलेला आहे. पेपर्स दाखवायचे नाही तर काम करायचे नाही. माझे वॉर्डमधील परमिशन दाखविले शिवाय काम करु देणार नाही. अमृत योजनेचे काम आहे त्यांचे खूप लोक आहे. त्या योजनेचे चेहरे कोण आहेत ते दाखवा. अमृत योजनेचे काम करीत असताना एकमेकांचे कॉडिनेशन नसेल तर कामे नीट होत नाहीत. प्रभागातील पुर्ण रस्त्याची खोदाई होते. त्यामुळे नागरीकांचा खेळखंडोबा झाला आहे. खड्डयात पडून मुलाला लागले त्याला जबाबदार कोण. आमच्या रस्त्यांचे लवकरात लवकर टेंडर करा.फूटपाथ केले असेल तर पेव्हींग करायचे असेल तर सगळयांची पाहणी करायची. स्मार्ट सीटीचे कोण लोक आहेत त्यांना बोलवा. स्मार्ट सीटीमध्ये कोणती कामे आलेली आहेत? अधिकारी कोण आहेत? प्रभाग क्र. २० मधील खोदाई बंद करायची. हे अधिकार तुम्हाला कोणी दिले आहे? या सगळयांची उत्तरे दयावीत.

**मा.आशा शेंडगे** – त्यादिवशी तशी परिस्थती निर्माण झाली असताना मोहाडीकर साहेबांना विचारले यापुढे काय नियोजन आहे? त्यांनी सांगितले की, आम्हाला सुचलच नाही. जेसीबी आपण लावले आहे. शिर्केचे जेसीबी लावायचे सुचायला नको का? बेजबाबदारपणे कशी उत्तरे देऊ शकतो? हा माणूस माझ्या वॉर्डमध्ये परत नको. उद्यापासून माझे वॉर्डात ही व्यक्ती काम करणार नाही.

**मा.शाम लांडे** – ठेकेदार एम.बी.पाटील यांचा स्थायी समितीला हा विषय काढला पाहिजे. ठेकेदाराची संपूर्ण माहिती घ्यावी. अमृत योजनेचे अंर्तगत पाचशे कोटीची कामे काढली आहेत. जीव घेण्याचे काम चालेले आहे. ठेकेदार एम.बी.पाटील यांना ब्लॅक लिस्टमध्ये टाकावे. आयुक्तांनी शहराचा बकालपणा आणला आहे व बदनाम नगरसेवक आहेत. ठेकेदाराचे पालनपोषण करण्याचे निम्मे काम अधिकारी करतात. मुख्य कॉन्ट्रॅक्टर यांनी सब कॉन्ट्रॅक्टर नेमले आहे. १४८ कोटीचे टेंडर एकटयाने घेतले आहे. खूप ठिकाणी कामे चालू आहेत. ड्रेनेजचे ७० टक्केने काम करायला लावले. मेन ठेकेदाराचे नावानेच बील लागले. याला पाणी, ड्रेनेज व कचरा विभागाचे अधि कारी जबाबदार आहेत. डांबरीकरण केल्यानंतर बीएसएनएल खोदकाम चालू केले आहे. पाणीपुरवठा दिवसाआड करण्याची काय गरज होती. चढाच्या भागाला अजिबात पाणी येत नाही. तीन तास पाणी केले आहे त्यापेक्षा दीडतास दररोज पाणी दयावे. दिवसाआड पाणी का केले आहे. दोन वर्षांनी नागरीकांना सामोरे जावे लागेल. प्रॅक्टीकल काम काहीच दिसत नाही. प्रत्येक विभाग प्रमुखाला बोलावून मिटींग घ्यावी.

**मा. राजू बनसोडे** - एम.बी.पाटील मोठा माणूस आहे तो त्याच्या घरचा. तीन माणसे गेली आहेत.आयुक्तांनी शहराचा बकलपणा वाढविला आहे. याला अधिकारी व ठेकेदार जबाबदार आहे. ठेकेदारावर गुन्हा दाखल केला नाही. मेन ठेकेदारावर गुन्हा दाखल करा. तोच जबाबदार आहे. त्याला काळया यादीत टाकून त्याचेवर गुन्हा दाखल केला पाहिजे. जी.बी.ला विषय काढणार, मी सोडणार नाही.

**मा.सुजाता पालांडे** – वर्किंगडेच्या दिवशी हे झाले आहे. अधिका-यांना माहिती झालेले असते. रविवारी सुट्टी होती. ठेकेदारांचे नियंत्रण नाही का?

**मा.सभापती** – कै.विशाल जाधव व कै.नागेश जमादार हे दुर्घटनेत गेले आहेत. अशाच दोन,तीन घटना काढल्या आहेत. आताच सर्व नगरसेवकांनी विषय मांडलेला आहे. तो विषय मोठा गंभीर आहे. गेलेल्या माणसांमुळे त्यांचे घरचे लोकांची अवस्था कशी असेल हे माहित आहे. त्यांना खूप सहन करावे लागते. चारही प्रभागातील नगरसेवकांना प्रश्न पडला आहे. मिडीयाकडे बातमी आली. मा.माई ढोरे या महापौर झाल्या आहेत आम्हाला सर्वांना खूप अभिमान आहे. ठेकेदाराची माहिती सगळयांनी सगळयांनी सांगि तली आहे. तो त्यांचे मनाप्रमाणे काम करतो. आम्हाला कॉन्ट्रॅक्टचे घेणे नाही. महापालिकेची सेवा करण्यासाठी अधिकारी नेमले आहे. शहराचा विकास करण्यासाठी अधिकारी असतात. कॉन्ट्रॅक्टर व अधिकारी यांना शिक्षा होऊ दया. कोणतेही अधिकारी नगरसेवकांना विचारत नाही. कॉन्ट्रॅक्टरला धारेवर धरायला पाहिजे होते. रविवारी काम का ठेवले. अधिका-यांना शिक्षा करायला पाहिजे. नाही तर हे प्रकरण कोर्टात जावू दया.

**मा.महापौर - उषा उर्फ माई मनोहर ढोरे-** सर्व उपस्थित नगरसेवक, अधिकारी व कर्मचारी यांचे स्वागत केले. खरतर जी घटना रविवारी झाली ती अत्यंत दुर्दैवी अशी घटना होती. त्या घटनेमध्ये दोन कुटूंब वंचीत झालेली आहेत. कधीही भरुन न निघणारी पोकळी निर्माण झाली आहे. पाटील कॉन्ट्रॅक्टर याला शिक्षा झाली पाहिजे. वर्कऑर्डर देतो त्यावेळी संबंधीत अधिका-यांनी पाहिलेले असते.अटी शर्ती देतो. फाईल मागवून घ्यायला पाहिजे होती. एवढा गलथान कारभार असून आम्ही सहन करणार नाही. रविवार शासकीय सुट्टीचा दिवस असतो.

संबंधीत ठेकेदाराकडून काम करुन घ्यायचे होते हे अधिका-यांना विचारले होते का? काम करीत असलेला तो भाग विचित्र भाग होता. त्या भागामध्ये अतिवृष्टी झाल्यामुळे जमिन भुसभुशीत झाली होती. भुसभुशीत जमिन असल्यामुळे २० फुटापर्यंत माती काढली होती. कॉन्ट्रॅक्टरचे व अधिका-यांचे लक्ष नव्हते. काम करीत असताना जी यंत्रणा पाहिजे होती ती नव्हती. जमिनीवरची माती घसरली तर इमर्जन्सी तिथे कोण होते? कामगारांना चिलखत नव्हते. कॉन्ट्रॅक्टरने त्यांना फसविले. ड्रेनेजचे अमृत योजनेचे काम होते. संबंधीत अधिका-यांना व स्थानिक ठेकेदाराला शिक्षा मिळाली पाहिजे. त्यांची घरे गेली आहेत त्यामुळे त्यांना नुकसान भरपाई मिळाली पाहिजे. फायर ब्रिगेडचा कर्मचारी वाचवायला गेला परंतू त्यांला त्याचा जीव गमवावा लागला. पैसे दिले तर आद्य कर्तव्य केले असे नाही. खूप दुर्दैवी घटना होती. ठेकेदाराला आदेश दिले जातील त्या पध्दतीने कामकाज राहिले पाहिजे. हा कामगार कॉन्ट्रॅक्टरचा होता. कॉन्ट्रॅक्टरची जी रक्कम होती ती शंभर टक्के मदत मिळाली पाहिजे. फायर ब्रिगेडचा कर्मचारी २६ वर्षाचा होता. त्याठिकाणी त्याला वीरमरण आले आहे. आईचा आत्मा काय असतो तो माहित आहे. आईवडील, सासूसासरे व पत्नी यांची परिस्थिती वेडीपिसी झाली होती. तुम्ही आता त्याचे बायकोला सावरा. तिला चांगल्या पोस्टवर नोकरी देणार आहोत असे बोलत होते. हे सगळयांना माहित असू दया. असे खड्डे असलेले काम करीत असाल तर आता जागे व्हा. कामकाज करताना धोका होणार नाही अशी घटना परत घडणार नाही अशी दक्षता घ्यावी.

**मा.चौघुले –** स्वामी विवेकानंद सोसायटी या ठिकाणी स्थापत्य विभागाने खड्डे केले आहे परंतु ते बुजविले नाही. झाडूवाली येत नाही. कॉन्ट्रॅक्टरने झाडूवाल्या दिल्या आहेत. आठ, पंधरा दिवस झाले आहेत कचरा पडलेला आहे. झाडूवाल्यांना साफ सफाई करायला पाठवा.

**मा.राजापुरे –** रस्त्यात खूप खड्डे झाले आहेत. शाळेत मुलांना महिला सोडवायला जाताना पडल्या आहेत. ताबडतोब रस्त्यावरील खड्डे बुजवि ण्यात यावेत.

**मा.माई काटे -** पाण्याच्या टाकीजवळ तीन वर्षापासून एक वॉचमन राहतात. त्यांचेजवळ १०,१५ कुत्री, ८,१० मांजर आहेत. त्यांचेकडे जाताना गेट उघडले तरी भिती वाटते. या लोकांना काढायला पाहिजे.

**सुरक्ष विभाग –** नवीन वॉचमन राहतो. तो अपंग आहे म्हणून त्यांना ठेवले आहे. पुढच्या वेळेस त्याला काढून टाकणेत येईल.

**मा.आशा शेंडगे –** उद्यान, स्मशानभूमीमधील माणसेच सापडत नाही. नवीन टेंडर काढले नाही त्यामुळे याला आपोआप मुदत मिळणार आहे. स्मशानभूमीमध्ये गुटखा, गांजा खाऊन घाण करतात. तेथे काय प्रकार चालतात या सगळया गोष्टी आम्ही बघायच्या का? पालिकेच्या आवारामध्ये का या घटना घडतात. ही अधिका-याची जबाबदारी आहे. त्या ठिकाणी गाय बांधली आहे. पावणेदोन कोटी रुपये खर्च केले आहे. काही तरी व्हीजन म्हणून काम केले आहे. एकही सिक्युरीटी कामावर नसतो. कर्मचा-यांना शिस्त नाही. गार्डनमध्ये वॉचमन नसतो. कुणाचे ठेके आहेत याबाबत वॉर्डमधील सर्व माहिती पाहिजे.

**मा.माई काटे –** तीन वर्षापासून विद्युत विभागाने एलइडीचे सुविधा दिल्या नाहीत.

**मा.संजय खाबडे -** एलइडीची पंधरा दिवसात व्यवस्थाकरण्यात येईल. चार महिन्यानी एग्रीमेंट होईल. एग्रीमेंट झाल्यावर पाठपुरावा करण्यात येईल.

**मा.माई काटे-** चार महिने थांबण्यापेक्षा जुन्या फिटींगला काय करता येईल का बघा.

**मा. सभापती** : सन्मा. सदस्य यांनी प्रभाग कामकाजाबाबत काही सुचना असतील त्या करणेस मान्यता देणेत येत आहे. तदनंतर माहे डिसेंबर २०१९ च्या नियमित सभेचे कामकाज सुरु करण्यात आले .

--------

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले..**

ठराव क. ११ — विषय क्र.- १

दिनांक –०५/१२/२०१९ — विभाग -

सुचक – मा. माधवी राजेंद्र राजापुरे — अनुमोदक - मा.सीमा चौगुले

**सदंर्भ –** मा.माधवी राजेंद्र राजापुरे यांचेकडील दिनांक ०५/१२/२०१९ चा प्रस्ताव.

प्रभाग क्र. ३१ नवी सांगवी, पिंपळे गुरव प्रभागातील खालील नवीन कामांचा विद्युत विभागामार्फत अंदाजपत्रकामध्ये समावेश करण्यात यावा.

१) प्रभाग क्र. ३१ मधील प्रमुख चौकांमध्ये हायमास्ट दिव्यांची व्यवस्था करणे.

२) प्रभाग क्र. ३१ मधील सर्व चौकांमध्ये सी.सी.टी.व्ही कॅमेरांची व्यवस्था करणे आणि वाहतुक सिग्नल व्यवस्था करणे.

३) प्रभाग क्र. ३१ मध्ये नव्याने विकसीत रस्त्यांवर दिवाबत्तीची सोय करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**मा.सभापती** – मा.सर्व नगरसेवक, अधिकारी/कर्मचारी सर्वच मिटींगला उपस्थित राहिले त्याबद्दल सर्वांचे आभार मानतो व मिटींग संपली असे जाहिर करतो.

सही/-
अंबरनाथ चंद्रकांत कांबळे
सभापती ह प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
कासारवाडी- ३४.

जा.क्र.हक्षेका/कावि/ १२३/२०१९
दिनांक – २०/१२/२०१९

सही/-
प्रशासन अधिकारी तथा सचिव
" ह" क्षेत्रीय कार्यालय
पिपरी चिंचवड महानगरपालिका
कासारवाडी – ३४.

प्रत – सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर.